सत्यमेव जयते

# अंदाज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**(सन २०१८-२०१९ पासून विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनांच्या रचनेतील बदलास तसेच अर्थसंकल्प निवेदन खंड-१ बंद करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत वित्त विभागाच्या प्रस्तावासंदर्भातील अहवाल)**

# तिसरा अहवाल

**(सदर अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी सादर करण्यात आला.)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
मार्च, २०१८

# अंदाज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**(सन २०१८-२०१९ पासून विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनांच्या रचनेतील बदलास तसेच अर्थसंकल्प निवेदन खंड-१ बंद करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत वित्त विभागाच्या प्रस्तावासंदर्भातील अहवाल)**

# तिसरा अहवाल

**(सदर अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी सादर  करण्यात आला.)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
मार्च, २०१८

(तीन)

## अंदाज समिती
## (२०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

१. श्री.अनिल कदम, वि.स.स.

**सदस्य**

२. ॲड.राज पुरोहित, वि.स.स.
३. श्री.धनंजय ऊर्फ सुधीर गाडगीळ, वि.स.स.
४. श्री.उन्मेष पाटील, वि.स.स.
५. श्री.कृष्णा खोपडे, वि.स.स.
६. श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.
७. श्री.विजय रहांगडाले, वि.स.स.
८. श्री.राजेश काशिवार, वि.स.स.
९. श्री.बाळासाहेब मुरकुटे, वि.स.स.
१०. श्री.आकाश फुंडकर
११. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
१२. श्री.सुनिल प्रभु, वि.स.स.
१३. श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स.
१४. डॉ.संजय रायमूलकर, वि.स.स.
१५. श्री.प्रतापराव पाटील-चिखलीकर, वि.स.स.
१६. श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.
१७. श्री.कुणाल पाटील, वि.स.स.
१८. श्री.वसंतराव चव्हाण, वि.स.स.
१९. श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, वि.स.स.
२०. श्री.दत्तात्रय भरणे, वि.स.स.
२१. श्री.प्रदीप जाधव (नाईक), वि.स.स.
२२. श्री.धैर्यशील पाटील, वि.स.स.
२३. श्री.अबु आझमी, वि.स.स.
२४. श्री.सुजितसिंह ठाकूर, वि.प.स.
२५. डॉ.निलम गोऱ्हे, वि.प.स.
२६. श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स.
२७. ॲड.राहुल नार्वेकर, वि.प.स.
२८. श्री.संजय दत्त, वि.प.स.
२९. श्री.अनंत गाडगीळ, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव,
२) श्री.अशोक मोहिते, सह सचिव (१)
३) श्री.शिवदर्शन साठ्ये, उप सचिव
४) श्री.विजय कोमटवार, अवर सचिव
५) श्री.मोहन काकड, कक्ष अधिकारी
६) श्री.सुनिल परब, कक्ष अधिकारी

# अ नु क्र म णि का


| अ.क्र. (१) | विषय (२) | पृष्ठ क्र. (३) |
| --- | --- | --- |
| १) | प्रस्तावना | |
| २) | अहवाल | |
| ३) | समितीचे अभिप्राय व शिफारशी | |
| ४) | परिशिष्ट - एक<br>(आर्थिक वर्ष २०१८-२०१९ पासून विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनांच्या रचनेतील बदलास तसेच अर्थसंकल्प निवेदन खंड-१ बदं करण्यासाठी अंदाज समितीची मान्यता मिळणेबाबत वित्त विभागाची माहिती.) | |
| | परिशिष्ट - दोन<br>(समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त) | |

## प्रस्तावना

मी अंदाज समितीचा समिती प्रमुख, समितीच्या वतीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन सन २०१८-२०१९ पासून विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनांच्या रचनेतील बदलास तसेच अर्थसंकल्प निवेदन खंड-१ बदं करण्यासाठी अंदाज समितीची मान्यता मिळणेबाबतचा वित्त विभागाने पाठविलेल्या प्रस्तावासंदर्भातील अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

**महाराष्ट्र विधानसभा नियम २०८ (१) अन्वये अर्थसंकल्प ज्या नमुन्यात विधानमंडळास सादर करावयाचा असतो तो नमुना सुचविण्यासाठी अंदाज समितीची स्थापना करण्यात येईल अशी नियमात तरतूद आहे.** तसेच महाराष्ट्र विधानसभा नियम २०९ (क) अनुसार समितीकडे विचारार्थ आलेल्या वित्तीय प्रश्नावर सरकारला सल्ला देणे ही एक महत्त्वपूर्ण जबाबदारी अंदाज समितीकडे सोपविण्यात आलेली आहे. यापूर्वीही शासनाने अशा प्रकारच्या वित्तीय बाबी समितीकडे विचारार्थ पाठविल्या होत्या. यावरील अहवाल समितीने त्या त्या वेळी सभागृहास सादर केलेले आहेत.

सन २०१८-२०१९ पासून विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनांच्या रचनेतील बदलास तसेच अर्थसंकल्प निवेदन खंड-१ बंद करण्यासाठी अंदाज समितीची मान्यता आवश्यक असल्याने वित्त विभागाने समितीकडे सदर प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविला आहे.

वित्त विभाग विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनांच्या रचनेतील बदलास तसेच अर्थसंकल्प निवेदन खंड-१ बंद करण्यासाठी संदर्भात अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग यांची साक्ष घेतली. सदर प्रस्तावास समितीने शिफारस करुन मान्यता दर्शविली आहे.

समितीसमोर प्रत्यक्ष उपस्थित राहून साक्ष दिल्याबद्दल श्री.दिनेशकुमार जैन, अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग व श्री.आर.ए.राजीव, प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग यांची समिती अत्यंत आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या वेळी आपला अमुल्य वेळ देऊन समिती सदस्यांनी ज्या आस्थेने व तत्परतेने हे काम पूर्ण करण्यास सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचे मन:पुर्वक आभार मानतो.

समितीने दिनांक मार्च, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत प्रारुप अहवालावर चर्चा केली व अहवाल संमत केला.

**विधान भवन**
मुंबई,
दिनांक मार्च, २०१८

**अनिल कदम**
समिती प्रमुख
अंदाज समिती

# अहवाल

अंदाज समिती ही महाराष्ट्र विधानमंडळाची एक अत्यंत महत्त्वाची वित्तीय समिती आहे. अर्थसंकल्पीय अंदाज आणि पूरक अनुदानासाठीच्या मागण्यांची छाननी करण्यासाठी आणि असे अंदाज व मागण्या ज्या धोरणावर आधारित असतील त्या धोरणाशी सुसंगत असे काटकसरीचे उपाय सुचविण्यासाठी आणि अर्थसंकल्प ज्या नमुन्यात विधानमंडळास सादर करावयाचा तो नमुना सुचविण्यासाठी अंदाज समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

**महाराष्ट्र विधानसभा नियम २०८ (१) अन्वये अर्थसंकल्प ज्या नमुन्यात विधानमंडळास सादर करावयाचा असतो तो नमुना सुचविण्यासाठी अंदाज समितीची स्थापना करण्यात येईल अशी नियमात तरतूद आहे.** Estimate Committee is authorized committee to suggest form of the budget. **तसेच महाराष्ट्र विधानसभा नियम २०९ (१) (क) अन्वये अंदाज समितीकडे विचारार्थ पाठविण्यात येतील अशा वित्तीय प्रश्नांवर सरकारला सल्ला देणे अशीही तरतूद केलेली आहे. कौल आणि शकधर यांच्या** PRACTICE AND PROCEDURE OF PARLIAMENT **या पुस्तिकेच्या सहाव्या आवृत्तीमधील पृष्ठ क्र.८७० वरील अंदाज समितीच्या कार्यपध्दतीमध्ये** Whenever Government want to make any change in the format or the information to be given in the Budget papers on Demands for Grants, the matter is referred to the Committee for their recommendations असे नमूद करण्यात आले आहे. उपरोक्त नियमाच्या तरतुदीच्या अनुषंगाने वित्त विभागाने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ व १३ डिसेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनांच्या रचनेतील बदलास तसेच अर्थसंकल्प निवेदन खंड-१ बंद करण्यास अंदाज समितीची मान्यता मिळण्याबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला.

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षापासून, केंद्र शासनाने योजनेतर व योजनांतर्गत खर्चाचे एकत्रिकरण केल्यामुळे तसेच त्यानुषंगाने राज्य शासनास निदेश दिल्याने, राज्य शासनानेही योजनेतर व योजनांतर्गत खर्चाचे एकत्रिकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. एक वर्षाच्या अनुभवानंतर विधानमंडळास सादर होणाऱ्या राज्याच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनाच्या रचनेत त्यानुरुप बदल करणे आवश्यक झाले आहे. या अनुषंगाने काही अर्थसंकल्पीय प्रकाशनातील माहितीमध्ये कोणताही बदल न करता फक्त रचनेतील बदलामुळे प्रकाशनामधील मजकूरात सुट-सुटीतपणा येवून माहितीचे अवलोकन करणे सुलभ होणार आहे. तसेच इंग्रजी व मराठी प्रकाशने एकाच प्रकाशनाद्वारे एकत्रितरित्या प्रकाशित केल्यास प्रकाशनांची व त्यातील पृष्ठांची संख्या कमी होऊन प्रशासकीय खर्चात बचत व प्रकाशने तयार होण्यास कमी वेळ

लागणार आहे. सदर सुधारित करण्यात येणारी प्रकाशने नव्याने विकसीत केलेल्या संगणकीय प्रणालीवर स्वयंप्रकट (Automatic Generation) होणार असल्याने प्रकाशनांमध्ये अचूकता येण्यास मदत होणार आहे. यास्तव खालील प्रस्ताव समितीस मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे :-

(अ) अर्थसंकल्पीय प्रकाशनातील रकान्याची संख्या कमी करुन रचनेमध्ये बदल :- यामध्ये खालील प्रकाशने आहेत :-

(१) अर्थसंकल्पीय अंदाज (भाग-दोन) खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज. (Deparment wise White Book) (प्रकाशन संख्या :- ३०)

(२) अर्थसंकल्पीय अंदाज (भाग-दोन) खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज. (Districtwise White Book) (प्रकाशन संख्या :- ३६)

(३) खर्चाचा प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा (Major Head-cum-Department wise Summary of Expenditure and Public Account) (प्रकाशन संख्या :- ०१)

(४) प्रस्तावित केलेल्या विनियोजनांची अनुसूची (Schedule of Appropriation) (प्रकाशन संख्या :- ०१)

वरील अ.क्र.१ ते ३ मधील प्रकाशनांमध्ये एकूण १० रकान्यात अर्थसंकल्पीय आकडेवारी प्रसिद्ध करण्यात येत आहे. अंदाज समितीच्या सहमतीने यापूर्वी घेतलेल्या निर्णयानुसार पुढील आर्थिक वर्षामध्ये (सन २०१८-२०१९) या प्रकाशनामध्ये १० रकान्याऐवजी ६ रकान्यामध्ये ही आकडेवारी प्रसिद्ध करावी लागेल. तथापि, सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या वर्गीकरणाची आकडेवारी योजनेत्तर, योजनांतर्गत व एकूण खर्च अशा ३ रकान्यात न दर्शविता ते एकाच रकान्यामध्ये दर्शविल्यास फक्त ४ रकन्यामध्येच अर्थसंकल्पीय अंदाजाची आकडेवारी दर्शविता येईल व यामुळे प्रकाशनामधील मजकूरात सुट-सुटीतपणा दिसून येईल.

तसेच अ.क्र.३ च्या प्रकाशनातील सुरुवातीच्या खर्चाच्या विवरणपत्रामधील प्रधानशीर्ष (Major Head) व प्रशासकीय विभाग (Administrative Department) हे २ रकाने एकत्रित केले असून अ.क्र.४ च्या प्रकाशनातील सुरुवातीच्या विवरणपत्रामधील विनियोजनाशी संबंधित असलेली कामे व प्रयोजने (Services & Purpose to which the Appropriation relates) व लेखाशीर्ष (Head of Accounts) हे २ रकाने एकत्रित केले आहेत.

सद्य:स्थितीत वरील प्रकाशनातील आकडेवारी दोन पृष्ठांवर उभ्या स्वरुपात समोरासमोर दिसते. तथापि, वरील प्रमाणे रकाने कमी झाल्यामुळे सदर आकडेवारी एकाच पृष्ठावर आडव्या स्वरुपात दर्शविल्याने ती सुलभपणे वाचने शक्य होऊन प्रकाशनांच्या पृष्ठांमध्ये बचत तसेच सदर प्रकाशने नव्याने

विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीवर स्वयंप्रकट (Automatically Generated) करण्याचे प्रस्तावित असल्याने बिनचूक प्रकाशन तयार होण्यास मदत होणार आहे.

(ब) वित्त विषयक विवरणपत्र (Financial Statement) (प्रकाशन संख्या - ०१)

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाचे वित्त विषयक विवरणपत्रामध्ये आवश्यक ते बदल सूचविण्यात आलेले आहेत. पूर्वीच्या सदर प्रकाशनामध्ये महसूली जमा/खर्च तसेच भांडवली जमा/खर्च हे समोरासमोरील पृष्ठावर दर्शविण्यात येत होते. तथापि, केंद्र शासनाच्या धर्तीवर प्रथम महसूली जमा/खर्च व त्यानंतर भांडवली जमा/खर्च याप्रमाणे बदल करण्यात आलेला आहे.

(क) इंग्रजी व मराठी अर्थसंकल्पीय प्रकाशने एकत्रित करुन सदर प्रकाशनांच्या रचनेमध्ये बदल :-

यामध्ये खालील प्रकाशने आहेत :-

(१) खर्चाचे पुरक विवरणपत्र (Supplimentary Statement of Expenditure) :- (प्रकाशन संख्या :- ०२)

(२) अर्थसंकल्प विषयक निवेदन खंड-२ (नवीन बाबी) (Budget Memorandum Volume- II) :- (प्रकाशन संख्या :- ०१)

(३) अधिक खर्चाचे विवरणपत्र (Statement of Excess Expenditure) (प्रकाशन संख्या :-०२)

वरील प्रकाशने मराठी व इंग्रजी भाषेत स्वतंत्रपणे विधानमंडळास सादर करण्यात येतात. आता सदर मागण्यांचे प्रकाशन नव्याने विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीवर मराठी व इंग्रजी भाषेमध्ये एकाच प्रकाशनाद्वारे स्वयंप्रकट करण्याचे (Automatically Generated) प्रस्तावित असल्याने पृष्ठांच्या संख्येत बचत होणार असून माहिती मध्ये कोणताही बदल संभवीत नसल्याने तसेच बिनचूक प्रकाशन तयार होण्यास मदत होणार आहे.

तसेच, खर्चाचे पुरक विवरणपत्र या प्रकाशनातील प्रधानशीर्षवार-नि-विभागवार सारांश (Major Head-cum-Department wise Summary) या विवरणपत्रातील माहिती खर्चाचे पुरक विवरणपत्र या विवरणपत्रात होत असल्याने सदर माहितीच्या दुरुक्तीमुळे प्रधानशीर्षवार-नि-विभागवार सारांश (Major Head-cum-Department Wise Summary) हे विवरणपत्र वगळण्यात येत आहे.

(ड) अर्थसंकल्प प्रकाशन वगळणे/बंद करणे :- यामध्ये खालील प्रकाशन आहे :-

अर्थसंकल्प विषयक निवेदन खंड-१ (Budget Memorandum Volume-I)

अर्थसंकल्पीय नियम पुस्तिकेतील परिच्छेद १३५ मध्ये अर्थसंकल्पीय निवेदनाबाबतची माहिती खालीलप्रमाणे दिलेली आहे :-

अर्थसंकल्प निवेदन :- अर्थसंकल्प निवेदनामध्ये मागील वर्षाच्या लेख्याचे आकडे चालू वर्षाचा अर्थसंकल्प व सुधारित अंदाज आणि आगामी वित्तीय वर्षांकरीता प्रस्तावित केलेले अर्थसंकल्पीय अंदाज यातील मोठ्या

तफावतीची स्पष्टीकरणे असतात. त्या त्या प्रधान शीर्षाखालील गौण लेखा शीर्षानुसार ही स्पष्टीकरण देण्यात येतात. निवेदनाच्या पहिल्या भागात जमा शीर्षाच्या संबंधातील तफावतीची स्पष्टीकरणे दिलेली असतात. दुसऱ्या भागात खर्चाच्या संबंधातील तफावतीची स्पष्टीकरणे दिलेली असतात. ही स्पष्टीकरणे विभागवार दिलेली असतात. त्यानंतर शासनाकडे असलेले राज्य टंचाई निवारण निधी, राज्य मार्ग निधी इत्यादींसारख्या निरनिराळ्या निधीचे प्रपत्र लेखे, लोक लेख्यांमध्ये दर्शविण्यात येतात.

सदर प्रकाशन बंद करण्याबाबत खालील कारणे/मुद्दे नमूद करण्यात येत आहेत :-

- वित्त विषयक विवरणपत्र (ग्रीन बुक) या प्रकाशनामध्ये मागील वर्षाच्या प्रत्यक्ष रकमा, चालू वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाज व सुधारीत अंदाज तसेच चालू वर्षातील सुधारित अंदाज व पुढील वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाज यातील मोठ्या तफावतीची प्रधान शीर्षावर करणे दर्शविण्यात येतात. त्यामुळे या माहितीची दुरुस्ती अर्थसंकल्प निवेदन या प्रकाशनामध्ये दिसून येते. तसेच सदर प्रकाशनामध्ये विविध विभागांखालील एकाच प्रधानशीर्षाखाली मोठ्या प्रमाणावर गौण शीर्ष निर्माण झाल्याने प्रत्येक गौण शीर्षाखालील तफावतीची कारणे नमूद करणे शक्य होत नाही.
- सदर प्रकाशनामध्ये विविध कार्यक्रमांवर होणाऱ्या खर्चाचा तपशील विस्तृत स्वरुपामध्ये देण्यात येतो. सदर कार्यपद्धती राज्य शासनाचे कार्यक्रम मर्यादित असतांना दर्शविणे योग्य होतील. मागील काही वर्षांमध्ये विविध विभागांकडून मोठ्या प्रमाणावर वेगवेगळ्या योजना राबविण्यात येत आहेत व या योजनांची माहिती त्या-त्या विभागाच्या कार्यक्रम अंदाजपत्रक या प्रकाशनामध्ये उपलब्ध करुन देण्यात येते.
- या प्रकाशनाची पृष्ठ संख्या ५०० इतकी असून सदर प्रकाशन मंत्रालयीन विभाग तसेच अभ्यासक यांच्यासाठी विशेष उपयोगाचे आढळून येत नाही. त्यामुळे अर्थसंकल्पीय प्रकाशनांमध्ये द्विरुक्ती टाळण्यासाठी उपरोक्त प्रकाशन सन २०१८-२०१९ पासून बंद करण्याबाबत समितीच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने अंदाज समितीने दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी वित्त विभागाच्या विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. सदरहू साक्षीच्या वेळी दिलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.**

वित्त विभागाच्या सचिवांनी सदरहू प्रस्तावाबाबतची पार्श्वभूमी विदित करतांना सांगितले की, रंगराजन समिती व प्रशासकीय सुधार समितीच्या अहवालानुसार गेल्या वर्षीच्या जानेवारी महिन्यामध्ये राज्य सरकारने अर्थसंकल्पातील योजना व योजनेत्तर खर्चाचे एकत्रिकरण करुन केंद्र सरकारच्या सूचनेनुसार अनिवार्य व कार्यक्रम खर्च अशा दोन भागांमध्ये अर्थसंकल्प प्रस्तुत करण्याची मान्यता दिली होती. त्या अनुषंगाने प्रकाशनांच्या रचनेमध्ये बदल करण्याबाबतची विनंती वित्त विभागामार्फत समितीला केली होती. समितीने दिनांक १४ फेब्रुवारी व २२ फेब्रुवारी,

२०१७ असे दोन दिवस साक्ष घेवून त्या बदलांना मान्यता दिली होती. त्यानुसार सन २०१७-१८ चा अर्थसंकल्प नवीन रचनेमध्ये सादर केला आहे. यापूर्वीच्या बैठकीमध्ये समितीसमोर सादर केले होते की, या अनुषंगाने आम्हाला यापुढे जे बदल करावयाचे आहेत ते व बजेटच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये व प्रकाशनामध्ये सुलभता येईल. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना वाचनामध्ये सुलभता येईल. यादृष्टीने वित्त विभागाकडून प्रयत्न करण्यात येणार आहे. त्यानुसार ज्या प्रकाशनांमध्ये बदल करणे योग्य वाटते अशी काही प्रकाशने वित्त विभाग समितीसमोर घेवून आलेला आहे.

विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, अर्थसंकल्पीय ७५ प्रकाशनातील प्रस्तावित बदल घेवून अंदाज समितीसमोर आलो आहोत. अ, ब, क, ड असे वेगवेगळया प्रकारामध्ये ते विभाजित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार पहिल्या गटामध्ये अर्थसंकल्पीय प्रकाशनातील रकान्यांची संख्या कमी करुन रचनेमध्ये बदल प्रस्तावित करण्यात आलेला आहे. यामध्ये चार प्रकारची प्रकाशने आहेत. यापूर्वी योजनेतर, योजनांतर्गत एकूण असे रकाने असायचे. आता योजनेतर व योजनांतर्गत यामध्ये बदल झाला आहे. मागील वर्षी अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी समिती समोर काही रकाने कमी करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले होते व त्यास समितीने मान्यता दिली होती. सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पामध्ये योजनेतर व योजनांतर्गत अशी तरतूद असल्यामुळे ते तसेच दाखविण्यात आले होते. मागील वर्षी म्हणजे सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पामधून ते रकाने काढण्यात आले आहेत. यावर्षी सन २०१८-१९ चा अर्थसंकल्प मांडण्यात येणार आहे. सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पामध्ये समितीच्या मान्यतेने योजनांतर्गत व योजनेतर हे रकाने एकत्रित करण्यात आले आहेत. सन २०१६-१७ मध्ये एकत्रित असलेले योजनांतर्गत व योजनेतर रकाने या प्रकाशनामधून जाणार आहेत. अगोदर १० रकान्यांचे पुस्तक होते. मागील वेळी दिलेल्या मंजुरीनंतर ते ६ रकान्यांवर आले. आता ते ४ रकान्यांचे होणार आहे. अर्थसंकल्पीय अंदाज (भाग-दोन) खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज हे प्रशासकीय विभागनिहाय असतात. शासनाचे ३० विभाग असल्यामुळे पुस्तकांची संख्या ३० असते. त्यामध्ये देखील बदल करण्यात येत आहे. याची जुनी व नवीन दोन्ही प्रकाशने समितीस सादर करण्यात येत आहे. तसेच दुसरे पुस्तक "जिल्हा योजना" असे असून, ते देखील समितीस सादर करण्यात येत आहे. तिसऱ्या पुस्तकाचे नाव खर्चाचा प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा व चौथ्या पुस्तकाचे नाव प्रस्तावित केलेल्या विनियोजनाची अनुसूची असे आहे. या सर्वांमध्ये रकान्यांची संख्या १० वरुन आता ४ रकान्यांवर आलेली आहे. याबाबतचे नमुने समितीस सादर करण्यात आले आहेत.

वित्त विभागाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अधिक माहिती घेताना समितीने विचारणा केली की, या बदलांमुळे प्रकाशनांमध्ये सुलभता यावी हा एक भाग झाला. परंतु सुलभतेच्या पलीकडे यामुळे पुस्तकांची छपाई किंमत कमी

करणे देखील साध्य होणार आहे का ? याबाबत विभागीय सचिवांनी उपरोक्त बाबीस संमती दर्शविली व यासंदर्भात माहिती दिली की, यामुळे पुस्तकातील पानांची संख्या कमी होणार आहे. तसेच वाचन करणे सुटसुटीत होणार आहे. योजनांतर्गत व योजनेतर हे रकाने एकत्रित केल्यामुळे खर्चाची देखरेख कशा प्रकारे होत आहे हे यामधून लक्षात येईल. १० रकान्यांऐवजी ४ रकाने केल्यामुळे वाचन करणे अतिशय सुटसुटीत होईल.

प्रस्तावाच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, खंड १ बंद करण्यामागे नेमके काय कारण आहे, त्याबाबत समितीला अवगत करावे. याबाबत विभागीय सचिवांनी असे प्रतिपादन केले की, ६८ पुस्तकांमध्ये आपण उपरोक्त बदल सुचविलेले आहेत. तसेच वित्तविषयक विवरणपत्राचे देखील एक पुस्तक असते. केंद्र शासनामध्ये अगोदर महसूली जमा व खर्च आणि नंतर भांडवली जमा व खर्च असे देण्यात येते. आपल्याकडे महसूल जमा व खर्च आणि समोरील पानावर भांडवली जमा व खर्च असे असते. त्याबाबत केंद्र शासनाच्या धर्तीवर बदल करण्यात आला आहे. हे देखील समितीला सादर करण्यात येत आहे. याचे पुस्तक हिरव्या रंगाचे असून ते समितीस सादर करण्यात येत आहे. पूर्वी भांडवली जमा व खर्च आणि महसुली जमा व खर्च हे समोरासमोर असायचे. आता तसे न होता अगोदर महसुली जमा व खर्च येईल आणि त्यानंतर भांडवली जमा व खर्च येईल. "क" वर्गामध्ये वित्त विभागाकडून इंग्रजी व मराठीची वेगवेगळी पुस्तके छापण्यात येत होती. त्यामध्ये मराठी शब्द जर समजत नसतील तर इंग्रजी शब्द व इंग्रजी शब्द समजत नसेल तर मराठी शब्द अंतर्भूत करण्यात येत असे. यामुळे सन्मा.सदस्यांना दोन पुस्तकांची कसरत करावी लागत होती. तथापि, आता यांचे एकत्रिकरण करण्यात आले आहे. एकाच पुस्तकामध्ये एका बाजूला इंग्रजी व दुसऱ्या बाजूला मराठी असे करण्यात आले आहे. हे पुस्तक देखील समितीला सादर करण्यात येत आहे. पुरवणी मागयांच्या वेळी खर्चाचे पूरक विवरणपत्र (Supplimentary Statement Of Expenditure) हे मराठी व इंग्रजी असे वेगवेगळे पुस्तक येत होते. ते आता एकत्रित येईल. अर्थसंकल्पाची परिभाषा समजणे हे गुंतागुतींचे असते परंतु या पुस्तकांमुळे सुटसुटीतपणा येऊन समजण्यास सुलभ होईल. अर्थसंकल्प विषयक निवेदन खंड-२ (Budget Memorandum Volume-II) व अधिक खर्चाचे विवरणपत्र (Statement of Excess Expenditure) ही आणखी दोन पुस्तके आहेत. या एकूण तीन पुस्तकांमध्ये इंग्रजी व मराठी असे एकत्रिकरण करण्यात येत आहे. याप्रमाणे अ, ब, क या वर्गातील पुस्तके झाली. तसेच वित्त विभागाकडून शेवटच्या ड वर्गामधील एक पुस्तक कमी करण्यात येत आहे. त्या पुस्तकाचे नाव अर्थसंकल्पविषयक निवेदन खंड-१ (Budget Memorandum Volume-I) असे नाव आहे. हे पुस्तक बंद करण्याचे वित्त विभागाकडून प्रस्तावित करण्यात आहे. त्याचे कारण असे की, या पुस्तकामध्ये असलेली मुख्य लेखाशीर्षानिहाय मोठ्या व कमी खर्चाच्या

तफावतीची/स्पष्टीकरणाची माहिती वित्त विषयक विवरणपत्रामध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे. तसेच इतर पुस्तकांमध्ये देखील यामधील माहिती देण्यात येते. या प्रकाशनामध्ये मुख्यशीर्ष व गौण शीर्ष निहाय मोठ्या व कमी खर्चाच्या तफावतीची स्पष्टीकरणे देण्यात येतात. मोठ्या प्रमाणावर गौण शीर्ष वाढल्यामुळे प्रत्येक तफावतीचे कारण देणे शक्य होत नाही. सदर प्रकाशनातील माहिती गौण शीर्षापर्यंतच असल्याने कोणत्या योजनेत खर्च होत आहे याबाबतचे आकलन होत नसल्याने प्रशासकीय विभाग व अभ्यासक यांना सदर प्रकाशनाचा फारसा उपयोग होत नाही असे निदर्शनास आले आहे. तसेच यामधील सर्व माहिती हिरव्या रंगाच्या पुस्तकामध्ये, प्रशासकीय विभागांच्या कार्यक्रम अंदाज पत्रकामध्ये व इतर प्रकाशनामध्ये असते.

उपरोक्त प्रकाशनाच्या विस्तारित विवरणपत्रामध्ये काही छाननी करण्यात आलेली आहे का ? अशी समितीने विचारणा केली असता. विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, छाननी करण्यात आलेली नाही. तथापि, मुख्यशीर्ष, उप मुख्यशीर्ष, गौणशीर्ष, गटशीर्ष, उपगटशीर्ष व उद्दिष्ठ याबाबतची सर्व माहिती इतर प्रकाशनात अंतर्भूत आहे. याबाबत आलेल्या अभिप्रायांवरुन वित्त विभागाने अंदाज समितीसमोर हे पुस्तक बंद करण्यासाठी प्रस्तावित केले आहे. हे मोठे पुस्तक असून ते बंद केल्यानंतर किंमतीमध्ये देखील बरीच बचत होईल. यावर समितीने अशीही विचारण केली की, प्रकाशनांची किंमत हा भाग वेगळा आहे. परंतु छाननी करुन जे पुस्तक करीत आहोत यामुळे अनुकरण होण्यासाठी काही अडचण आहे का ? त्यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू प्रकाशनामध्ये काहीही अडचण नाही. कारण योजनांची संख्या खूप जास्त झालेली आहे. त्यामुळे प्रत्येक योजनेची सविस्तर माहिती या पुस्तकामध्ये देणे शक्य होत नाही कारण की, प्रत्येक विभागाच्या नवनवीन योजना वाढतच जातात.

सदर प्रकाशनामध्ये देण्यात येणारी माहिती संकलित केलेली आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता. विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, यामध्ये विस्तारित माहिती देण्यात आली आहे. अर्थसंकल्पीय अंदाज (भाग-दोन) खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज यामध्ये मुख्यशीर्ष, उप मुख्य शीर्ष, गौण शीर्ष, गट शीर्ष, उपगट शीर्ष व उद्दिष्ठ याबाबतची सर्व माहिती अंतर्भूत आहे.

अर्थसंकल्पाचे वाचन व समजणे सुलभ होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे अशी समितीने सूचना केली. तसेच समितीने असेही निर्देशनास आणले की, विकास कामांसाठी काही रक्कम शासनाकडून राखून ठेवली जाते. त्या बाबतचा कार्यानुरुप अहवाल वर्षाच्या शेवटी सन्माननीय सदस्यांना मिळाला तर किती रक्कम शिल्लक राहिली व किती खर्च झाली याबाबतची माहिती मिळेल. तसेच सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पाची माहिती पुस्तके व सीडीच्या माध्यमातून माहिती देण्यात यावी. त्याचा गोषवारा समिती समोर सादर करावा. तसेच अंदाज

पत्रकातील माहिती एकत्रित मिळालीतर सदस्यांना कोणत्या विभागात किती खर्च झाला आहे याची महिती मिळेल.

याबाबत विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, प्रत्येक विभागाचे कार्यक्रम अंदाज पत्रक तयार केलेले आहे. किती रक्कम प्राप्त झाली, त्यापैकी किती खर्च झाली, विनियोजन कसे झाले याचा कार्यक्रम अंदाजपत्रकामध्ये गोषवारा दिलेला असतो. प्रत्येक विभागाचे कार्यक्रम अंदाजपत्रक विधान मंडळाच्या पटलावर ठेवले जाते. विभागाचा पुर्नविलोकनाचा तो भाग असतो. ते पुस्तक प्रकाशित केले जाते व अर्थसंकल्पाचे वाचन सुलभ करण्यासाठी परिचय पुस्तक तयार करण्यात आले आहे. आता अर्थसंकल्पामध्ये सुटसुटीतपणा आणलेला आहे. महालेखाकार कार्यालयाने निश्चित केलेल्या वर्गीकरणानुसार अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. योजनांतर्गत व योजनेत्तर या स्तंभाचे एकत्रीकरणामुळे जी आकडेवारी येईल, त्यामुळे ही माहिती सहजपणे सदस्यांना मिळू शकेल. प्रत्येक विभागाची पुस्तिका ४ रकान्यात तयार केली जाणार आहे. तसेच विभागवार माहिती सोडून जे पुस्तक तयार केले आहे त्यात देखील ही माहिती दिलेली आहे. खर्चाचे प्रधान शीर्षवार व विभागवार सारांश या पुस्तकात रकाने कमी झाल्यामुळे वाचण्यास सुलभता येईल.

अर्थसंकल्प गोपनीय असला तरी देखील त्या नंतर विधानमंडळाच्या सदस्यांना अभ्यास करण्यासाठी सभागृहामध्ये अनेकदा विभागाकडून वेळेवर कार्यक्रम अंदाज पत्रकाची पुस्तके दिली जात नसल्यामुळे सभागृहामध्ये गोंधळ होतो किंवा काही वेळा सभागृहाची बैठक स्थगित होते. या कारणास्तव विधानमंडळाची प्रतिष्ठा कमी होते व जनतेमध्ये विधानमंडळाबाबत चुकीचा संदेष जातो. ही संबंधित विभागाची जबाबदारी आहे. सभागृहामध्ये वेळेवर पुस्तके न मिळाल्यामुळे मा.वित्त मंत्री यांना त्यासंदर्भात निवेदन करावे लागते. ही अतिशय गंभीर बाब आहे. तसेच त्यामुळे विधानमंडळ सदस्यांचा विशेष अधिकाराचा भंगही होऊ शकतो असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय सचिवांनी विदित केले की, अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर विभागवार चर्चा केली जाते त्यावेळी ती पुस्तके उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. दर वर्षी कार्यक्रम अंदाजपत्रकाची पुस्तके वेळेवर सादर करण्याबाबत वित्त विभागामार्फत सर्व विभागांना सूचना दिली जाते.

विधानसभेत अर्थसंकल्पावरील विभागवार चर्चा सुरु झाल्यानंतर कार्यक्रम अंदाजपत्रकाची पुस्तके मिळाली नाहीत तर सदस्यांना सभागृहामध्ये चर्चा करण्यास अडचणी निर्माण होतात. सदरहू बाबी लक्षात घेता प्रशासनाची त्रुटीमध्ये शासनावर टिका होते. त्यामुळे प्रत्येक विभागाने याबाबत दक्षता घेणे आवश्यक व त्यांच्यावर याबाबतची जबाबदारी निश्चित करावी. यासंदर्भात वित्त विभागाने संबंधित मंत्रालयीन विभागांना निर्देश द्यावे असे समितीचे मत आहे. याबाबत विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, प्रत्येक

विभागाचीच ही जबाबदारी आहे. याबाबत पुन्हा वित्त विभागामार्फत सूचना देण्यात येतील. समितीची भावना माननीय वित्त मंत्री व मुख्य सचिव यांना कळविण्यात येईल व मुख्य सचिवांच्या आदेशाने पुढील कार्यवाही केली जाईल. त्यावर समितीने सूचना केली की, संबंधित विभागाच्या सचिवांवर जबाबदारी निश्चित करावी.

यावर्षी अर्थसंकल्पा संबंधीची २ पुस्तके कमी होणार आहेत. तसेच मराठी व इंग्रजी अशी २ पुस्तके पुरवणी मागणीच्या वेळी येतात. अर्थसंकल्पातील ९२ पुस्तकांची संख्या ९० वर येणार असून नंतरच्या ४ पुस्तकांची संख्या २ होणार आहे. अर्थसंकल्पीय प्रकाशनाच्या रचनेत ज्या सुधारणा करण्यात येणार आहेत, त्यास समितीने मान्यता द्यावी, अशी विभागीय सचिवांनी विनंती केली असता समितीने विचारणा केली की, यावर्षीच्या वित्तीय अंदाजपत्रकाची पुस्तके व सीडी सन्माननीय सदस्यांना दिली जाणार आहेत काय ? त्यावर विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, प्रकाशने सॉफ्ट फॉर्ममध्ये देता येतील काय, या संबंधी विधिमंडळाच्या सन्माननीय सदस्यांची समिती माननीय वित्त मंत्री महोदयांची यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये याबाबत चर्चा सुरु असून अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. पुस्तक व सॉफ्ट कॉपी या दोन्ही फॉर्मेटमध्ये ही माहिती सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करुन द्यावी. त्यासंदर्भात समितीने सूचित केले की, अनेक खाजगी संस्था, तज्ञ मंडळी अर्थसंकल्पावरील पुस्तके वाचून त्या संबंधीची माहिती सदस्यांना उपलब्ध करुन देत असतात. आता सर्व कामकाज शासनाला पेपरविरहीत करावयाची आहे. परंतु विधानमंडळ सदस्यांना पुस्तके न देता केवळ सीडी दिली तर त्याचा फारसा उपयोग होणार नाही. यामुळे सीडी व पुस्तके दोन्ही सदस्यांना उपलब्ध करुन देण्यात यावेत. त्यावर विभागीय सचिवांनी आश्वासन दिले की, समिती सदस्यांची भावना माननीय वित्त मंत्री महोदयांना कळविण्यात येईल.

अर्थसंकल्पीय प्रकाशनांच्या रचनेत ज्या सुधारणा करण्यात येणार आहेत. त्यास समितीने मान्यता देण्याबाबत विभागीय सचिवांनी केलेल्या विनंतीनुसार अर्थसंकल्पाच्या संबंधी ज्या काही नवीन सुधारणा करण्यात येत आहे, त्याला अंदाज समितीने मान्यता दिली.

*************

# अभिप्राय व शिफारशी

*************

# परिशिष्ट - एक
## (वित्त विभागाकडून प्राप्त झालेली माहिती)

# परिशिष्ट - दोन
# (समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त)

**पहिली बैठक**
**मंगळवार, दिनांक १६ जानेवारी, २०१८.**
**स्थळ :- विधान भवन, मुंबई.**

**उपस्थिती :**

**समिती प्रमुख**

१) श्री.अनिल कदम, वि.स.स.

**सदस्य**

२) श्री.उन्मेष पाटील, वि.स.स.
३) श्री.कृष्णा खोपडे, वि.स.स.
४) श्री.राजेश काशिवार, वि.स.स.
५) श्री.बाळासाहेब मुरकुटे, वि.स.स.
६) श्री.आकाश फुंडकर
७) श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
८) श्री.सुनिल प्रभु, वि.स.स.
९) श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स.
१०) डॉ.संजय रायमूलकर, वि.स.स.
११) श्री.प्रतापराव पाटील-चिखलीकर, वि.स.स.
१२) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.
१३) श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, वि.स.स.
१४) श्री.दत्तात्रय भरणे, वि.स.स.
१५) श्री.अबु आझमी, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री.अशोक मोहिते, सह सचिव (१)
३) श्री.शिवदर्शन साठ्ये, उप सचिव
४) श्री.विजय कोमटवार, अवर सचिव
५) श्री.सुनिल परब, कक्ष अधिकारी

**मंत्रालयीन अधिकारी**

१) श्री.दिनेश कुमार जैन, अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग
२) श्री.आर.ए.राजीव, प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग
३) श्री.व.कृ.पाटील, सह सचिव, वित्त विभाग
४) श्री.र.ना.माळी, अवर सचिव, वित्त विभाग
५) श्री.सु.मु.ऐगळीकर, अवर सचिव, वित्त विभाग

सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पीय प्रकाशनाच्या रचनेत करावयाच्या बदलासंदर्भात वित्त विभागाच्या विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. (साक्ष पूर्ण)

**दुसरी बैठक**
**गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०१८.**
**स्थळ :- विधान भवन, मुंबई.**

**उपस्थिती :**

**समिती प्रमुख**

१. श्री.अनिल कदम, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री.धनंजय ऊर्फ सुधीर गाडगीळ, वि.स.स.
३. श्री.उन्मेष पाटील, वि.स.स.
४. श्री.विजय रहांगडाले, वि.स.स.
५. श्री.राजेश काशिवार, वि.स.स.
६. श्री.बाळासाहेब मुरकुटे, वि.स.स.
७. श्री.आकाश फुंडकर, वि.स.स.
८. श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स.
९. श्री.वसंतराव चव्हाण, वि.स.स.
१०. श्री.प्रदीप जाधव (नाईक), वि.स.स.
११. श्री.धैर्यशील पाटील, वि.स.स.
१२. श्री.अबु आझमी, वि.स.स.
१३. श्री.सुजितसिंह ठाकूर, वि.प.स.
१४. श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री.अशोक मोहिते, सह सचिव (१)
३) श्री.शिवदर्शन साठ्ये, उप सचिव
४) श्री.विजय कोमटवार, अवर सचिव
५) श्री.मोहन काकड, कक्ष अधिकारी
६) श्री.सुनिल परब, कक्ष अधिकारी

समितीने प्रारुप अहवालावर चर्चा करून अहवाल संमत केला